वर्ष १७ वे

अंक १ ला

जगु शकलात तर चंदनासारखे जगा।
स्वतः झीजा आणि इतरांना गंध द्या।




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च **रु. एक कोटी**
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१६**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०१७**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११,००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

नुकताच दि. २१.०८.२०१६ रोजी आपल्या मित्र मंडळाचा स्नेहमेळावा व विद्यार्थी, ग्रामस्थ गौरव समारंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात पार पडला. कार्यक्रमासाठी **मा.श्री.पोपटराव पवार** प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परंतु आता खेदाने नमूद करावेसे वाटते की, या समारंभास पारनेरकरांची उपस्थिती अतिशय कमी होती. मा.पोपटराव पवार नसते तर ती आणखी कमी झाली असती. त्यामुळे आपल्या मंडळाच्या कार्यकारिणीने आत्मचिंतन करणे आवश्यक झाले आहे असे वाटते. मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके याच काळात प्रकृति अस्वास्थ्यामुळे व्यक्तिशः सर्वांपर्यंत पोहोचू शकले नाही, त्यामुळे सभासद आले नाही असे मला वाटते. त्यामुळे इतर पदाधिकाऱ्यांनी आता सभासदांपर्यंत व्यक्तीशः जाणे गरजेचे झाले आहे. श्री.घोडके यांनी आता ७३ वर्षेपार केली आहेत, त्यामुळे त्यांना आता योगदान बंधनकारक करू नये, अशी माझी नम्र विनंती आहे. असो,

मा.पोपटराव पवार यांनी आपल्या वक्तव्यामध्ये नागरिकांची मानसिकता बदलण्यावर भर दिला. त्यांनी सामाजिक काम करताना प्रथम हिवरे बाजार गावातील रहिवाशांची मानसिकता बदलली, त्यामुळे हिवरे बाजार गावास 'आदर्श ग्राम' म्हणून मान्यता मिळाली. हीच भावना आपल्या सर्व सभासदांमध्ये पेरली गेली तर आपल्या परानेर तालुका मित्र मंडळाची सामाजिक उद्दीष्टांची पूर्तता पूर्णपणे होण्यास जास्त वेळ लागणार नाही.

नुकतेच आपल्या मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहाचे चौथ्या व पाचव्या मजल्याचे आर.सी.सी. काम पूर्ण झाले असून खोल्यांच्या विटकामाचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. आता आपल्याला आणखी निधीची आवश्यकता आहे. मा.हौसाराम घोडके हे सहकाऱ्यांच्या मदतीने निधी गोळा करीत असले तरी तो निधी कमीच पडणार आहे. त्यामुळे या पवित्र सार्वजनिक कामासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून आपणही पुढाकार घ्यावा असे मी आपणास कळकळीचे आवाहन करतो.

यावर्षी पाऊसपाणी चांगला झाला असल्याने सर्वांची आर्थिक परिस्थिती चांगलीच राहणार आहे. त्यामुळे नोटाबंदी झाली तरी तो त्रास काही दिवसापुरताच राहणार आहे व त्यानंतर सर्वसामान्य लोकांचे जीवनान चांगल्या प्रतीचे राहील, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. या अंकामध्ये **पुण्यातील प्रथितयश उद्योजक शिवश्री बाळासाहेब मातेरे यांचे कर्तृत्व संकलित केले आहे.** ते आपण जरूर वाचावे. प्रतिकुल वातावरण असले तर पारनेरकरांच्या कर्तृत्वाला धार येते, ही धारणा बाळासाहेबांच्या निमित्ताने परत एकदा पक्की झाली आहे.

आपणा सर्वांना आपल्या नोकरी तसेच व्यवसायातील यशस्वी कारकिर्दीसाठी मनापासून शुभेच्छा देऊन माझ्या संपादकीयास अर्धविराम देतो ।।

जय जिजाऊ । जय शिवराय ।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

**सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना**

**नववर्ष २०१७**

**सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही शुभेच्छा !**

## अभिनंदन



**प्रा.सुनिल रंगनाथ राजेनिंबाळकर,** रा.गांजीभोयरे हे गोपीनाथ ज्युनियर कॉलेज, वरवंड, ता.दौंड येथे कार्यरत असून त्यांना दौंड तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेच्या वतीने **'आदर्श शिक्षक पुरस्कार'** प्रदान करण्यात आला. यापूर्वी त्यांना पद्मश्री मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्टतर्फे **'मणीरत्न'** हा आदर्श सेवा पुरस्कार तसेच युवा क्रिडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे सामाजिक कामासाठी **'राष्ट्रसेवा पुरस्कार'** प्राप्त झाला.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२१.०८.२०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मालधक्का चौक, पुणे येथे सायंकाळी ५.०० ते ७.३० या वेळात संपन्न झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **मा.श्री.पोपटराव पवार,** कार्याध्यक्ष - आदर्श ग्राम योजना, महाराष्ट्र राज्य यांचा सत्कार **डॉ.बाळासाहेब बांडे** यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा.राजेंद्र धोरडे पाटील** यांचा सत्कार **श्री.अशोक वाबळे** यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

**प्रा.सुनील राजेनिंबाळकर** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविका-मध्ये त्यांनी मंडळाच्या १९८० पासून आतापर्यंतच्या वाटचालीतील विविध कामकाजाचा आढावा घेतला. मराठीचे प्राध्यापक काय असतात याचे प्रत्यंतर त्यांच्या बोलण्यातून क्षणाक्षणाला जाणवत होते. **बुद्धीवैभव लाभलेला दर्या-डोंगर पठारांचा हा तालुका** आहे. याचा त्यांनी आर्जवून उल्लेख केला. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरी विद्यार्थ्यांची राहण्याची चांगली व्यवस्था व्हावी म्हणून **''पारनेर भवन''** नावाची देखणी वास्तु मंडळाने उभी केली आहे. आजमितीस तेथे ८० विद्यार्थी राहात आहेत. **आणखी दोन मजल्याचे बांधकाम सुरू झाले असून ते पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वांना आर्थिक मदत करण्याचे त्यांनी आवाहन केले.**

प्रमुख पाहुणे **मा.श्री.पोपटराव पवार** यांचा परिचय **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी **''उभा महाराष्ट्र ज्यांचे आदराने नाव घेत आहे''** अशा सार्थ शब्दात करून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष **श्री.राजेंद्रजी धोरडे पाटील** यांचा परिचय उपाध्यक्ष **श्री.मधुकरराव शिरोळे** यांनी करून दिला. **'स्वातंत्र्यपूर्व काळात धोरडे घराण्याचे स्वातंत्र्य मिळविण्याच्या चळवळीत फार मोठे योगदान होते.'** अशा शब्दातून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तोच वारसा राजेंद्र धोरडे पाटील आपला व्यवसाय सांभाळून सामाजिक व शैक्षणिक कामात समर्थपणे पुढे चालवीत आहेत.

इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी केले तर बारावीच्या विद्यार्थी यादीचे वाचन **प्रा.माधवराव गायके** यांनी



स्नेहमेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना १) इंजि.विजयकुमार ठुबे, २) मधुकर शिरोळे, ३) भाऊसाहेब नरड सर, ४) मा.पोपटराव पवार, ५) मा.राजेंद्र धोरडे पाटील.

केले. तसेच त्यांनी गुणवंत ग्रामस्थांची माहिती दिली. प्रमुख पाहुणे, मा.अध्यक्ष व व्यासपीठावरील मंडळाचे सर्व पदाधिकारी यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी व ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

**मा.पोपटराव पवार** यांनी सांगितले की, **'पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांनी लावलेल्या आदर्श ग्राम योजनेच्या चळवळीतील छोटेसे रोपटे हिवरे बाजारात लावण्याचे काम मी पूर्णवेळ देऊन केले.** त्यांनी पाणी पंचायतीच्या कामाचा सर्वांगिण आढावा घेतला. राजकारणापासून दूर राहून मोठे काम करता आले असे त्यांनी अभिमानाने सांगितले. कॉलेजमध्ये असताना प्लॉट विक्रीचे काम करताना गावाकडील माणसात प्रचंड माणुसकी आहे याची जाणीव झाली. माती व दगड गोटे यातच दुःख वाटून घेताना रोजगार व बुद्धी मिळाली. १९७२ च्या दुष्काळात लोकांनी गाव सोडली. परंतु नंतर अथक काम करून गावात प्रतिकुलता जाऊन अनुकूलता आणली. **बौद्धिक, व्यावसायिक, शैक्षणिक व सामाजिक उंची गाठून गावात खूप सुधारणा केल्या आहेत. पारनेर तालुका मित्र मंडळाने नुसते पारनेर तालुक्यासाठी नव्हे तर नगर जिल्ह्यातील किंबहुना महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी पुण्यात विद्यार्थी वसतिगृह उभारणाऱ्या मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके यांच्या कार्याचा त्यांनी**



मा.पोपटराव पवार यांचा सत्कार करताना डॉ.बाळासाहेब बांडे व सर्वश्री बाजीराव जगदाळे, विजयकुमार ठुबे व राजेंद्र धोरडे पाटील.

**खास उल्लेख केला.** युपीएससी मध्ये उत्तीर्ण झालेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. जात व धर्म या पलीकडे जाऊन मोठे कार्य उभे राहिले आहे असे त्यांनी आर्जवून सांगितले. आपण जेव्हा मुंबईला जातो तेव्हा जिल्ह्याचे (नगरचे) नाव सांगतो. दिल्लीला जातो तेव्हा राज्याचे नाव सांगतो. परदेशात जातो तेव्हा आशियायी देशातील म्हणून सांगतो. असा विशाल दृष्टीकोन आपण आपलासा करतो. गावागावातील भांडणे थांबली तर चांगली देखणी गावे उभी राहतील असे त्यांनी तळमळीने सांगितले. निवडणुक संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, लाखो रूपये देऊन मते विकत घेतली जातात. पण **प्यायला पाणी नाही, रस्ते धड नाहीत, गावात शाळेला इमारती नाहीत ही आपली खेडेगावातील व्यवस्था.** माणसाची मानसिकता बदलली पाहिजे. शिक्षण व्यवस्था दुरुस्त केली पाहिजे. गरीबांनी शिक्षणासाठीची प्रचंड फी



ॲड.सौ.इंदुमती व ॲड.श्री.नितीन भालेराव यांनी मंडळास रू.१ लक्ष देणगी दिल्याबद्दल श्री.पोपटराव पवार यांचे हस्ते सत्कार.




मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके यांचा सत्कार करताना श्री.राजेंद्र धोरडे पाटील व इतर मान्यवर.



बांधकाम व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते सौ.व श्री.रामा एरंडे यांचा सत्कार करताना मा.पोपटराव पवार इतर मान्यवर



उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते सौ.व श्री.भगवान पठारे यांचा सत्कार करताना मा.पोपटराव पवार इतर मान्यवर

कोठून आणायची? **इथे दिवस उगवल्यावर प्रश्न सुरू होतो, माथ्यावर आल्यावर मोठा होतो, सायंकाळी अती गंभीर बनतो.** अण्णांच्या राळेगण सिद्धी बरोबर आदर्श गाव हिवरे बाजार बनण्यासाठी त्यांनी २००२ सालापासून घेतलेला ध्यास सांगितला. गडचिरोली येथील शेकडो पोलीसांच्या बंदोबंस्तात ६ आदर्श गावे बनविल्याचा त्यांनी अभिमानाने उल्लेख केला. योग्य दिशा दिली तर आपण पूर्वीचे वैभव परत मिळवू शकू असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.'

कार्यक्रमाचे अध्यक्ष **राजेंद्रजी धोरडे पाटील** यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून भाषणास सुरूवात केली. स्वातंत्र्यपूर्व काळातही त्यांच्या घराण्याचे मोठे योगदान होते याचा त्यांनी आर्जवून उल्लेख केला. **क्रांतीसिंह नाना पाटील, डॉ.पी.बी.कडू पाटील, भास्करराव औटी** असे स्वातंत्र्यसैनिक भूमीगत असताना त्यांचे आजोबा मारुतराव धोरडे पाटील यांच्या वसतीवर राहात असत. ब्रिटीशांच्या डोळ्यात धूळ फेकून हे प्रेरणादायी काम ते मनापासून करत असत. **श्री.हौसाराम घोडके** यांच्या तत्पर कामामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना तसेच आजारी व्यक्तींना आर्थिक मदत मंडळामार्फत देऊन तालुक्यातील लोकांशी जुळलेली नाळ महत्वाची आहे. **मा.धोरडे पाटलांनी त्यांच्या ट्रस्टच्या माध्यमातून मोठी देणगी देण्याचे जाहीर केले आहे.**

या कार्यक्रमानंतर मंडळाची सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी समर्थपणे सांभाळली. तसेच आभारही त्यांनीच मांडले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम समाप्तीनंतर मंडळातर्फे आयोजित केलेल्या अल्पोपहाराचा आस्वाद सर्वांनी घेतला.

**शब्दांकन - भाऊसाहेब नरड**

**टिप :- कार्यक्रमाचे सर्व फोटो पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**



स्नेहमेळाव्याप्रसंगी उपस्थित
पारनेर तालुका मित्र मंडळाचे सभासद, विद्यार्थी व हितचिंतक.

## सेवानिवृत्ती



❊ **श्री.वसंत गणपत मोरे**, रा.यादववाडी हे हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन भारत सरकार या कंपनीमधून चिफ फायनान्स सुपरिटेंडेंट या पदावरून ३४ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०८.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.किसन महादेव मातेरे**, रा.बाभुळवाडे हे युनियन बँक ऑफ इंडिया या राष्ट्रियकृत बँकेतून हेड कॅशियर या पदावरून ३९ वर्षे ९ महिन्यांच्या सेवेनंतर **दि.३०.०९.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त तसेच त्यांच्या दि.११.०९.२०१६ रोजीच्या एकसष्टी समारंभानिमित्त त्यांच्या पत्नी **सौ.लिलाबाई, सुपुत्र श्री.अमित व अतुल, स्नुषा सौ.प्रिती अमित व सौ.मितल अतुल व नात कु.त्विशा** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.भास्करराव रामचंद्र राऊत**, रा.राऊतवाडी हे पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेतून सहव्यवस्थापक या पदावरून ३७ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०६.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले.

## निधन वार्ता




❊ **रामभाऊ गोविंद खोडदे**, वय **६४** वर्षे, रा.किन्ही यांचे दि.१४.०६.२०१६ रोजी निधन झाले.



❊ **विष्णुपंत बापुराव कुलकर्णी**, वय **७६** वर्षे, रा.बाभुळवाडे यांचे दि.०२.०९.२०१६ रोजी निधन झाले. त्यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने गौरविले होते.



❊ **विश्वनाथ काशिनाथ वाबळे**, वय **८७** वर्षे, रा.निघोज यांचे दि.१०.१०.२०१६ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र श्री.अशोक यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **अण्णासाहेब दौलतराव पठारे**, वय **९२** वर्षे, रा.वडुले यांचे दि.१०.१०.२०१६ रोजी निधन झाले. प्राचार्य डॉ.संभाजीराव अण्णासाहेब पठारे हे त्यांचे सुपुत्र होत.



❊ **सोनाबाई हरकू बर्वे**, वय **८६** वर्षे, रा.वासुंदे यांचे दि.१०.०८.२०१६ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र श्री.किसनराव यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

SHIVRAJ
AQUATECH WATER TREATMENTS

# SHIVRAJ AQUATECH WATER TREATMENTS

Sales of Solar Water Heaters & Water Purifiers
(Domestic / Commercial / Industrial)

# SHIVRAJ ENTERPRISES

**Service & Installation of Solar Water Heaters & Water Purifiers**

**Authorised LIC, Mediclaim & Preventive Health Care Consultant**

LIC
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Personal and Caring
Star Health and Allied Insurance Company Limited

नॅशनल इन्श्योरेन्स
National Insurance

indus health PLUS
The Preventive Health Checkup Specialist
An ISO-9001-2000 company

**Add. : Sr. No. 284 / 9 / 1, Building No. A-2, Flat No. 2, Kakde Park, Keshavnagar, Chinchwad, Pune 411033. Mo. : 7709505555 / 9175505555.**

# आपण असे केले तर

❊ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१६ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे **प्रा. जगन्नाथ तुकाराम देंडगे**, रा. गांजीभोयरे व **श्री. नामदेव मारुती साबळे**, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास अनुक्रमे **रु.१०००/- व रू.१,५०१/-** देणगी दिली.



❊ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१६ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **श्री.अनिकेत** यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.




❊ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१६ च्या वाढदिवसा निमीत्त पिताश्री **श्री.तुकाराम विठ्ठल नरसाळे,** रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❊ **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे आडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.प्रविण** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **कै. श्रीमती लक्ष्मीबाई आश्रुजी आग्रे** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र **श्री.भागुजी** यांनी **रु.५०००/-** व **श्री.अशोक** यांनी **रु.१०००/-** मंडळास देणगी दिली.



❊ **कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि.२०.०२.२०१७ च्या व **कै.भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१६ च्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.गणेश** यांनी मंडळास **रु.११११/-** देणगी दिली.



❊ **कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा. पारनेर यांच्या दिनांक २३.१०.२०१६ च्या स्मृतीनिमित्त त्यांच्या पत्नी **श्रीमती मृदुला** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **कै. कृष्णाबाई सुखदेव पोटे**, रा.बाभुळवाडे यांच्या दि.२८.०७.२०१६ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.कुंडलीक सर** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.अरूण शंकरराव देंडगे**, रा.गांजीभोयरे यांनी त्यांची नात **कु.स्वरा श्रीराम देंडगे** हिच्या दि.२९.०९.२०१६ च्या वाढदिवसा- निमित्त मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे,** रा.कान्हुरपठार यांनी त्यांच्या दिनांक ०१.११.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे,** रा. कान्हुरपठार यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दिनांक २९.११.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. राजेंद्र खंडू थोरात,** रा. पाडळी आळे यांनी त्यांचे पिताश्री **कै.खंडू गेणू थोरात** यांचे दि. ११.११.२०१६ चे स्मृतीदिना निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. लालचंद उर्फ सुर्यकांत त्रिलोकचंद मुथीयान** रा.कान्हूर पठार यांच्या दि.१४.०९.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त त्यांचे सुपुत्र नेत्रतज्ञ **डॉ.सुशिलकुमार** यांनी मंडळास **रू.१३०००/-** देणगी दिली.



❊ **श्रीमती सुशिला शांताराम कावरे,** रा.सिद्धेश्वरवाडी यांच्या दि.२२.०८.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सुनबाई **श्रीमती शुभांगी सुधाकर कावरे** यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.




❊ **सौ.अंजली विक्रांत घोडके,** रा.पारनेर यांनी त्यांच्या दि.०५.१०.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ **श्री.सुधाकर पाराजी आढाव,** रा.सांगवी सुर्या यांनी **पिताश्री कै.पाराजी भाऊ आढाव व मातोश्री कै.सौ.कुसुमबाई पाराजी आढाव** यांचे स्मृतीप्रित्यर्थ्य मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ **श्री.गंगाधर भिवा कोठावळे,** रा.सांगवी सुर्या यांनी **पिताश्री कै.भिवा शिवराम कोठावळे** यांच्या दि.१७.१०.२०१६ रोजीच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.प्रमोद दत्तात्रय काळे,** रा.शहाजापूर यांनी त्यांच्या दि.०१.११.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **डॉ. सुधाकर रामचंद्र खराडे,** रा. निघोज यांनी त्यांच्या दि. ३०.१०.२०१६ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

# अभिनंदन




❈ **कु.निधी राजेंद्र थोरात,** रा.पाडळी आळे हिला इ. दहावीमध्ये **९२%** गुण मिळाले. ☞

❈ **कु.स्नेहल अशोक धामणे,** रा.पुणे हिला **बी.ई. मेकॅनिकल** मध्ये विशेष श्रेणी मिळून **७२%** गुण प्राप्त झाले.

❈ **कु.अस्मिता एकनाथ शिरोळे,** रा.पाडळी दर्या ही विद्यार्थिनी पहिल्याच प्रयत्नामध्ये **संधी लेखापाल**ची परीक्षा उत्तिर्ण झाली.



❈ **कु.अधिराज सुनिल राजेनिंबाळकर,** रा.गांजीभोयरे हा विद्यार्थी साधना विद्यालय, हडपसर येथे इ. ७ वी मध्ये शिकत असून त्यास **'बॉल बॅडमिंटन'** या क्रिडा प्रकारात विभागीय पातळीवर यश मिळाले असून त्याची राज्यस्तरीय संघामध्ये निवड झाली.



❈ **श्री.बन्सी भागुजी गवळी,** रा.अपधुप यांची **अतिरिक्त जिल्हाधिकारी** म्हणून पदोन्नती झाली. सध्या ते मुंबई येथे **अप्पर मुद्रांक नियंत्रक** म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या पदोन्नतीनिमित्त त्यांनी मंडळास **रू.११०००/–** देणगी दिली.



❈ **श्री.हेमंत अनंत नागवडे,** रा.रुई छत्रपती हे भेकराई माता माध्यमिक विद्यालय, फुरसुंगी येथे कार्यरत असून त्यांची पुणे जिल्हा कलाशिक्षक संघ या संघटनेवर पुणे जिल्हा संघ प्रमुख पदी निवड झाली. तसेच श्री.शंभू महादेव शिक्षक-शिक्षकेतर सहकारी पतसंस्था, फुरसुंगी या संस्थेवर सचिवपदी निवड झाली.



❈ पारनेर तालुका मित्र मंडळाचे कार्यकारीणी सदस्य व महाराष्ट्र राज्य सर्टिफाईड ऑडीटर संघाचे अध्यक्ष **श्री.रामदास सोनाजी शिर्के** यांची **पारनेर तालुका सहकारी औद्योगिक वसाहत लि.कर्जुले हरेश्वर** या संस्थेच्या **अध्यक्षपदी** बिनविरोध निवड झाली.



❈ **प्रा.डॉ.सुरेश बाजीराव पठारे,** रा.वाळवणे हे एम.एस्सी. एम.फील. असून इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठातर्फे **संख्याशास्त्र** या विषयाची **पी.एच.डी.** प्रदान करण्यात आली.

# नांदा सौख्य भरे

❈ श्री.बबनराव गणपतराव खामकर, रा.वडगाव सावताळ यांचे सुपुत्र **चि.प्रशांत** व श्री. बाबुराव ठकाजी झावरे, रा.वासुंदे यांची मुलगी **सौ.सुकन्या** यांचा शुभविवाह **दि.०६.११.२०१६** रोजी संपन्न झाला.

❈ प्रा.श्री.माधव पंढरीनाथ गायके, रा.वासुंदे यांची सुकन्या **सौ.अश्विनी** व श्री. रामदास दशरथ झांबरे, रा.हिंगणी, ता.आष्टी, जि.बीड यांचे सुपुत्र **अॅड.सुधीर** यांचा शुभविवाह **दि.२३.११.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

# पारनेर परिवार मित्र मंडळ, अ'नगर गुणगौरव कार्यक्रम

**पारनेर परिवार मित्र मंडळ, अहमदनगर** या संस्थेची यांच्या वतीने दि.१०.०७.२०१६ रोजी पार पडलेल्या गौरव सोहळ्यात 'पारनेर भूषण' पुरस्काराबरोबरच अनेक गुणवतांना गौरविण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान देणारे न्यू आर्टस् कॉलेज, अहमदनगर चे प्राचार्य **डॉ.भास्करराव झावरे** व कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा.आम. दादाभाऊ कळमकर** यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी परिवाराचे **अध्यक्ष श्री.तारकराम झावरे** यांच्या उपस्थितीत प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

पारनेर मित्र परिवारातर्फे आयोजित केलेल्या गुणगौरव सोहळ्यामध्ये **यु.पी.एस.सी.** मध्ये विशेष नैपुण्य मिळविलेल्या **श्री.दत्तात्रय शिंदे, श्री.विष्णू औटी,** स्वामी समर्थ बँकेचे चेअमरन **अॅड.अशोकराव शेळके,** शिक्षक बँकेचे नूतन चेअरमन **श्री.रावसाहेब रोहोकले,** नगरसेवक **दिलीपराव सातपुते,** हमाल पंचायत अहमदनगरचे जिल्हा अध्यक्ष **श्री.अविनाश घुले** तसेच १०वी ते पदवीपर्यंत विशेष प्राविण्य मिळविलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पारनेर तालुक्यातील अनेक मान्यवरांची व ग्रामस्थांची लक्षणिय उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय दुधाडे यांनी तर आभार प्रदर्शन श्री.सुरेश थोरात सर यांनी केले.



# बाळासाहेब मातेरे – उद्योगी व उमदे व्यक्तीमत्व

विष्णू उर्फ बाळासाहेब महादेव मातेरे आज बांधकाम क्षेत्रातले एक दिग्गज व्यक्तीमत्व! पण हे सर्व एका दिवसात घडले नाही. ते कसे घडले हे आपण जाणून घेऊया. तत्पूर्वी बाळासाहेबांची कौटुंबिक व आर्थिक पार्श्वभूमी जाणून घेतल्याशिवाय आपणास पुढे जाणे शक्य नाही.

पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे हे त्यांचे गाव. गावचे केदारेश्वराचे मंदिर पंचक्रोशीत प्रसिद्ध. वडील महादेव रामचंद्र मातेरे पोलीस खात्यात नोकरी व आई बबईबाई गृहीणी. या दांपत्याला एकूण ९ मुले, पाच मुले व चार मुली, त्यात बाळासाहेबांचा नंबर सहावा. बाळासाहेबांचे वडील पोलीसमध्ये होते पण त्यांचा पगार अगदीच तुटपुंजा. वडील करारी व कडक शिस्तीचे. सर्व मुले मुली त्यांच्या अतिशय धाकात. एवढेच काय त्यांच्या समोर उभे राहण्याचीसुद्धा कोणाची हिम्मत नसे.

**बाळासाहेबांच्या मातोश्री बबईबाई यांचा स्वभाव म्हणजे करूणेचा सागरच**. त्यांच्या मातोश्रींची माहिती घेतल्याशिवाय आपण पुढे पाऊल टाकूच शकत नाही. नवऱ्याचा तुटपुंजा पगार, पदरी नऊ मुले पण त्यांनी कधीच परिस्थितीची बाऊ केला नाही. तर आव्हान म्हणून त्यांनी सर्व समस्यांना यशस्वीपणे तोंड देऊन सर्व मुलामुलींना कष्ट, जिद्द व प्रामाणिकपणाचे धडे देऊन आज सर्वजण समाजात मानाने जीवन जगत आहेत. त्यांनी मुलांसाठी काय केले नाही, जात्यावर दळणं दळली, शेतीवर तसेच गवंड्याच्या हाताखाली मजुरीची कामे केली, लोकांची घरे सारवली, पोलीसाची बायको असे काही करील यावर आज कोणाचा विश्वास बसणार नाही पण साधारण ५०-६० वर्षांपूर्वी ही सत्य परिस्थिती होती. वेळ प्रसंगी पिठाच्या गिरणीतील खाली पडलेले पीठ सुद्धा या कुटुंबाची भूक भागवत होते. पण बाई मोठ्या जिद्दीच्या. प्रत्येक नवी गोष्ट शिकून आत्मसात करण्याची त्यांची विलक्षण हातोटी. यातूनच त्यांनी भाजीचा व्यवसाय सुरू करून



नावारूपाला आणला. त्यातून सारे कुटुंबच उर्जीतावस्थेत आणले. **त्यांनी मुलांना प्रामाणिकपणा व उद्योगप्रियता शिकविली.**

**आज बाळासाहेब जे काही आहेत ते त्यांच्या मातोश्रींमुळेच**. बाळासाहेबांनी अकरावीनंतर मातोश्रींचा भाजीपाल्याचा व्यवसाय सुरू केला व भरभराटीस आणला. त्या जोरावरच त्यांनी वाहतुकीसाठी दोन टेम्पो विकत घेतले. त्यानिमित्ताने महाराष्ट्रभर फिरलेले ते स्वतः निष्णात ड्रायव्हर असल्यामुळे स्वतःच गाडी चालवत असत. असा हा व्यवसाय भरभराटीस येत असता मातोश्री बबईबाईंचे अल्पशा आजाराने १९८१ मध्ये निधन झाले. याचा या कुटुंबावर जबरदस्त आघात झाला. त्यातच त्यांच्या टेम्पोला लागोपाठ अपघात झालेमुळे आतापर्यंतची सर्व कमाई त्यांच्या दुरुस्तीला गेली, ते कर्जबाजारी झाले. साहजिकच घरातील वातावरण थोडेसे गढूळ झाले.

याच सुमारास म्हणजे १९८३ साली त्यांचे मावस भाऊ श्री.पोपटराव शिरोळे त्यांचेकडे आले असता उद्विग्न मनस्थितीतच त्यांनी पोपटरावांच्या बरोबर लातुरला प्रयाण केले. पोपटराव तेथे ठेकेदारीचा व्यवसाय करीत. ते पाटबंधारे विभागाची, धरणाची व कॅनॉलची कामे करीत. तेथे दोन वर्षेराहिल्यानंतर त्यांनी सुद्धा भागीदारीमध्ये एक काम सुरू घेतले व त्यात त्यांना बऱ्यापैकी पैसे मिळाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला. **यातच त्यांचे लग्न सौ.सिंधुताईंशी झाले व नववधूंच्या प्रवेशाने त्यांच्या घरात लक्ष्मीच अवतरली.**

**संकटे नेहमीच हात धुवून मागे लागतात पण विचारी व उद्योगी व्यक्ती त्यातून तेवढ्याच जिद्दीने बाहेर पडते**. लग्न झाल्यानंतर बाळासाहेबांनी लातूर सोडले व पुण्यात येऊन बांधकामासंबंधीत कामे करू लागले. प्रयत्न करून त्यांनी १९९८ मध्ये



प्रसिद्ध व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते श्री.बाळासाहेब मातेरे यांचा सत्कार करताना मा.अण्णासाहेब हजारे व इतर मान्यवर

**व्ही.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** या कंपनीचे रजिस्ट्रेशन केले व सार्वजनिक बांधकाम खात्याकडे तिची नोंदणी केली व हळूहळू रस्त्याचे कामे घेऊन ती मुदतीत व दर्जेदारपणे करून देऊ लागल्यामुळे त्यांना कामे मिळू लागली.

त्यांच्या कामाचा दर्जा, काम वेळेवर पूर्ण करण्याचा कटाक्ष असल्यामुळे हळूहळू कामाचा व्याप वाढत गेला. त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची कामेसुद्धा मिळू लागली. **आज मितीला त्यांच्या कंपनीचा वार्षिक टर्नओव्हर सुमारे २०० कोटी रूपये आहे.**

आज ते महाराष्ट्रातील मोठे ठेकेदार असून संपूर्ण महाराष्ट्रात त्यांची कामे चालू आहेत. नम्रता हा त्यांच्या स्वभावाचा उपजत गुणच असल्यामुळे शासकीय कार्यालयामध्ये आदबशीर वागणे व नम्रता असल्यामुळेच त्यांची कामे विनातक्रार होतात.

या सर्व वाटचालीत त्यांना अनेक मित्र, अधिकारी असे भेटले कि त्यांनी त्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले. शासकीय अधिकाऱ्यांनासुद्धा अशा हरहुन्नरी व प्रामाणिक माणसांची गरज असतेच. यात आवर्जून उल्लेख करण्यासारखे बांधकाम खाते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचीव श्री.मधुकरराव पाटील, सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील, आयुक्त श्री. दिलीप बंड याशिवाय श्री.नानासाहेब माळी, श्री. राजाराम जाधव, श्री. विजय कुलकर्णी, वडीलकीने पाठीवर थाप मारणारे श्री. सुभाष खुशालचंद रांका असे अनेक सुहृद मार्गदर्शक त्यांना मिळाले. त्यांचा उल्लेख ते आवर्जून करतात.

कौटुंबिक आघाडीवर सौ. सिंधुताईंच्या पहिल्याच बाळंतपणात लक्षात आले की त्यांना हृदयविकाराचा त्रास आहे. त्यातून त्या सहिसलामत बाहेर पडल्या व आज कंपनीचे सर्व व्यवस्थापन तसेच संगणक विभाग त्या यशस्वीरित्या पाहतात. बाळासाहेबांचे सुद्धा हृदयाचे ऑपरेशन झाले आहे. त्यांचा **मुलगा रोहीत बी.कॉम., एम.बी.ए.** असून तो सुद्धा त्यांना व्यवसायात मदत करीत आहे. त्याने **''मातेरे रियल इस्टेट कंपनी''** स्थापून त्याद्वारे बांधकाम क्षेत्रात प्रवेश केला आहे.


**बाळासाहेबांनी धंद्यामध्ये काही पथ्य पाळली आहेत. ती म्हणजे कामगार, इंजिनियर, ठेकेदार यांना वेळच्या वेळी पेमेंट करणे, काम नेहमी उच्च प्रतीचे झालेच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष, मग त्यात नफा कमी मिळाला तरी चालेल, समोरच्या व्यक्तीचा कल्पकतेने वापर करून त्याच्या कौशल्याला वाव देणे. सद्गुणाकडे लक्ष देणे, दुर्गुणांकडे दुर्लक्ष करणे ही त्यांची खासीयत. धंद्यामध्ये त्यांना अनेक टक्केटोमणे खावे लागले. प्रसंगी नातेवाईक मित्र यांच्या बरोबर सुद्धा मतभेद झाले. पण कधी कधी तोटा सोसूनसुद्धा त्यांनी मतभेद मिटवून कटुता वाढू दिली नाही. ''भांडण्यात प्रगती खुंटते व संवादाने प्रगती होते'' हे त्यांचे ब्रीदवाक्य.**

त्यांच्या सामाजिक व धार्मिक कार्याबद्दल बोलायचे झाल्यास त्यांनी आतापर्यंत अनेक शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक संस्थांना देणगी तर दिलीच पण वैयक्तिक सुद्धा अनेकांना आर्थिक मदत केली. **पारनेर तालुका मित्र मंडळाला तर ते कायमच सढळ हाताने मदत करतात.** त्यांची अशीच उत्तरोत्तर प्रगती व्हावी हीच सदीच्छा!

**संकलक – हौसाराम घोडके**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## कार्यकारिणी २०१६-२०१९



**हौसाराम घोडके**
(अध्यक्ष)



**मधुकर शिरोळे**
(उपाध्यक्ष)



**इंजि.विजयकुमार ठुबे**
(अध्यक्ष,बां.स.)




**सुनील पोटे**
(सेक्रेटरी)



**प्रा.गोरक्ष जगताप**
(सहसेक्रेटरी)



**बाजीराव जगदाळे**
(कार्यवाहक)



**अशोक वाबळे**
(सहकार्यवाहक)



**सखाराम गागरे**
(सदस्य)




**डॉ.बाळासाहेब बांडे**
(सदस्य)



**रामदास शिर्के**
(अंतर्गत हिशेब तपासणीस)



**मुरलीधर चौधरी**
(सदस्य)



**भाऊसाहेब नरड**
(सदस्य)



**प्रा.माधवराव गायके**
(सदस्य)



**काशीनाथ गायकवाड**
(सदस्य)




**बाळासाहेब येणारे**
(सदस्य)



**सुनील कोल्हे**
(सदस्य)




**प्रा.सुनील राजेनिंबाळकर**
(सदस्य)



**विलास ठुबे**
(सदस्य)



**किरण तिकोने**
(सदस्य)




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________